जा.क्र. प्राकृसंकें/कृविवि/ 1798 / /२०२३
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड
दिनांक 11 SEP 2023

प्रति,

**मा. विस्तार शिक्षण संचालक,**
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि. रत्नागिरी .

**विषय** : विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीरातीस/दरपत्रक प्रसिध्दी देणेबाबत....

महोदय,

सोबत जोडलेल्या दरपत्रकास/जाहीरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दी मिळणे करीता सविनय सादर.

धन्यवाद,

सोबत : वरिल प्रमाणे.

आपला विश्वासु,

सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड

# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,

## कर्जत, जि. रायगड

## कृषीविद्या विभाग

जा.क्र.ससंसं/प्राकृसंके/कृविवि/कं.म./1798/२०२३ दिनांक 11/09/2023

### जाहिर प्रसिध्दी

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील कृषिविद्या विभागात खरीप २०२३ या हंगामातील शेती विषयक प्रयोगाची व बिजोत्पादनाची कामे करावयाची आहेत. कामाची यादी सोबत जोडली आहे. सदरची कामे ०१ ऑक्टोबर, २०२३ ते ३१ डीसेंबर, २०२३ या कालावधीत करावयाची आहेत. ही कामे निव्वळ कंत्राटी पध्दतीने करावयाची आहेत. तरी कामे करण्यास इच्छुक असणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांनी आपले दरपत्रक या कार्यालयास **दिनांक : २७/०९/२०२३** पर्यंत किंवा त्या पुर्वी सादर करावे. सोबत कामाच्या अटी व शर्ती आपल्या माहितीसाठी जोडण्यात आलेल्या आहेत.

सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
ता. कर्जत, जि. रायगड

प्रत : प्रसिध्दीसाठी

१. नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, जि. रायगड.
२. मा. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी
३. मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी
४. ग्रामपंचायत, हालीवली, किरवलणी यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
५. विद्यापीठ संकेतस्थळ, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषीविद्यापीठ, दापोली.

## प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील कृषिविद्या विभाग मधील शेतीविषयक आणि प्रायोगिक कामे ठेका पद्धतीने करावयाचे दरपत्रक

दिनांक:

प्रती,

मा.सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत—४१०२०१, जिल्हा—रायगड.

विषय : प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील कृषिविद्या विभाग मधील शेतीविषयक प्रयोगाची व बिजोत्पादनाची कामे ठेका पद्धतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक

संदर्भ : जा.क्र.ससंसं/प्राकृसंके./कृविवि/कं.म./    /२०२३ दि.

आपल्या वरील संदर्भित जाहीर प्रसिद्धी पत्रान्वये प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील कृषिविद्या विभाग मध्ये शेतीविषयक प्रयोगाची व बिजोत्पादनाची कामे ठेका पद्धतीने करण्यासाठीचे दरपत्रक खालील प्रमाणे.

| कामाचा तपशील | कृषिविद्या विभागातील कामाचा कालावधी ०१ ऑक्टोबर, २०२३ ते ३१ डीसेंबर, २०२३ |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये दिलेल्या कृषिविद्या विभागामधील शेतीविषयक कामाचे दरपत्रक | रूपये..........<br><br>अक्षरी........... |

मला सर्व अटी व शर्ती मान्य आहेत तरी माझे दरपत्रक मंजूर करावे ही विनंती.

सही :.....................................................

नांव :.....................................................

पत्ता :.....................................................

## प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत जि. रायगड

## कृषिविद्या विभाग

मला ठेक्याबाबतच्या सर्व साधारण अटी व शर्ती मान्य आहेत.

१. प्रक्षेत्रावरील कामे संबधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमुन देतील त्याचप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाच्या देयकाची आदायगी महिना पूर्ण झाल्यावर केली जाईल, त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पूर्ण केलेबाबतच्या दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराकडे स्वत:चे पॅन कार्ड व बॅक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांच्या कामाचे वेतन व त्याअनुषंगीक रक्कम संबधीत कामगारांच्या बॅक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहीत कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चित केलेली असावी.

९. याचिका क्र. १५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायलय मुंबई यांच्या दि. १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगीतीस अनुसरून परिच्छेद क्र. ५१ (ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचांऱ्याच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. कंत्राटी मजुरांच्या हिताच्या दृष्टिकोनातून त्यांचा अपघात विमा आवश्यक असून यापूढे ठेका मजूर करतांना सर्व ठेक्यावरील मजुरांचा पोष्टाच्या कार्यालयाकडून PLI काढण्यात आल्याबाबत कंत्राटदाराकडून प्रमाणित करून घेणे बंधनकारक राहील.

१२. ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१३. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

१४. वरील ठेका ०१ ऑक्टोबर, २०२३ ते ३१ डीसेंबर, २०२३ या कालावधीकरीता मर्यादित असेल.

ठेकेदार

(                                        )

# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत जि. रायगड

## कृषिविद्या विभाग

विभागामधील शेतीविषयक, **प्रयोगाची व** बिजोत्पादनाची कामे माहे ०१ ऑक्टोबर, २०२३ ते ३१ डीसेंबर, २०२३ या कालावधीत करावयाची आहेत तरी ठेका पद्धतीने करावयाच्या कामाची यादी.

| अ. क्र. | कामाचा तपशील |
|---|---|
| १ | खरिप २०२३-२४ हंगामातील घेण्यात आलेले विविध ११ भात प्रयोगाची बेनणी करणे |
| २ | कर्जत - ८, ३० गुंठे क्षेत्रावरील बिजोत्पादन मधील बेणणी करणे, भेसळ काढणे. |
| ३ | कर्जत - ३, ५० गुंठे क्षेत्रावरील बिजोत्पादनामधील बेणणी करणे, भेसळ काढणे. |
| ४ | विविध भात लागवड प्रात्यक्षिक पध्दतीमधील बेणणी करणे |
| ५ | भात बिजोत्पादन विविध भात प्रयोग, विविध प्रात्यक्षिके तसेच प्रक्षेत्राच्या रिंगलाइन्स यांना खंताची तणा देणे. |
| ६ | भात बिजोत्पादन विविध भात प्रयोग विविध प्रात्यक्षिके तसेच प्रक्षेणाच्या रिंगलाइन्स यांना किडी व रोग यांच्यापासुन संरक्षण करण्यासाठी पिंकावर किटक नाशक, रोगनाशक व बुरशीनाशक ची फवारणी करणे. |
| ७ | प्रक्षेणच्या कुंपणाची दुरुस्ती काणे. |
| ८ | प्रक्षेणाच्या बांधावर रस्त्यावर नाल्यात तणनाशकाची फवारणी करणे. |
| ९ | विविध ११ भात प्रयोग आणि प्रात्यक्षीके यांची निरीक्षणे घेण्यास मदत करणे. |
| १० | कर्जत - ८, ३० गुंठे बिजोत्पादन क्षेत्राची कापणी करणे गोळा करुण थ्रेशिगं यार्ड वर वाहतुक करणे, मळणी करणे, झोडणी करणे, भात उत्पादन साफ करणे मुख्य भांडारात बियाणे जमा करणे. पेंडा रचुन ठेवणे. |
| ११ | कर्जत - ३, ५० गुंठे बिजोत्पादन क्षेत्राची कापणी करणे गोळा करुण थ्रेशिगं यार्ड वर वाहतुक करणे, मळणी करणे, झोडणी करणे, भात उत्पादन साफ करणे मुख्य भांडारात बियाणे जमा करणे. पेंडा रचुन ठेवणे. |
| १२ | कर्जत - ७ प्रात्यक्षिक क्षेत्राची कापणी करणे, गोळा करुण थ्रेशिगं यार्ड वर वाहतुक करणे, मळणी करणे, झोडणी करणे, विविध निरिक्षणे घेण्यास मदत करणे, उत्पादन साफ करणे मुख्य भांडारात बियाणे जमा करणे. पेंडा रचुन ठेवणे. |
| १३ | विविध भात लागवड, प्रात्यक्षिक पध्दतीने भात कापणी करणे. गोळा करुण थ्रेशिगं यार्ड वर वाहतुक करणे मळणी करणे झोडणी करणे उत्पादन जमा करणे मुख्य भांडारात बियाणे जमा करणे. पेंडा रचुन ठेवणे. |
| १४ | विविध ११ भात प्रयोग आणि प्रात्यक्षिके यांची संस्कारानुसार निरिक्षणे घेण्यास मदत करणे (उंची फुटवे एका चुडातील लोंबीची संख्या (m²) लोंबीची लांबी, लोंबीचे वजन १००० दाणे वनज, पूर्ण प्लॉटमधील दाण्याचे वनज, पुर्ण प्लॉटमधील पेंड्याचे वजन, पूर्ण प्लॉटमधील भाऱ्याचे वजन) भात प्रयोगाची संस्कारानुसार कापणी करणे मळणी करणे. |
| १५ | प्लास्टीक अच्छादन तंत्रज्ञान (कर्जत - ८) भात बिजोत्पादन क्षेत्रात संशोधन प्रयोगात बेनणी करणे. |
| १६ | विविध पध्दतीने भात लागवड करण्याच्या ११ पध्दतीमधील बेनणी करणे |
| १७ | विविध प्रयोगांमधील व प्रात्यक्षिकामधील तण काढणे, खते व पाणी व्यवस्थापन करणे. |

१८ RCT - I (रब्बी) प्रयोगाची आखणी करणे बांध ओढणे व बियाणे पेरण्यासाठी मार्करने रेषा मारणे व सपाट वाफे तयार करणे व पाणी देणे

१९ प्लास्टीक आच्छादन तंत्रज्ञान पध्दतीमध्ये मधुमका (सुगर ७५) या पिकाची लागवड करणे खते देणे पाणी देणे.

२० विविध पध्दतीने भात लागवड पध्दती मध्ये प्लास्टीक आच्छादन पध्दत S. R. T. सवंर्धित शेती मध्ये हरभरा, मका, वाल पिकांची पेरणी करणे खते देणे पाणी देणे.

२१ जनरल वाल पिक पेरणी साठी सपाट वाफे तयार करणे, वाल बियाण्याची पेरणी करणे खते देणे पाणी देणे

२२ जनरल मोहरी पिक पेरणी साठी सपाट वाफे तयार करणे मोहरी बियाण्याची पेरणी करणे खते देणे व पाणी देणे

२३ कार्यालयाची तसेच प्रक्षेत्राची साफसफाई करणे.

२४ बांध बंधिस्ती दुरुस्ती करणे.

२५ प्रक्षेत्रावरील नाल्याची साफसफाई करणे.

२६ प्रक्षेत्रावर आयत्यावेळी उदभवणारी कामे करणे.